जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २३१ दिनांक :- २७/०८/२०२१

# २६,९३,४००/रु किंमतीचा चरस नावाच्या अंमली पदार्थासह ०३ आरोपींना रंगेहाथ पकडण्यास वालीव पोलीसांना यश

दिनांक २५.०८.२०२१ रोजी रात्रीच्या सुमारास तीन इसम गुजरात बाजुकडुन कोल्ही चिचोंटी येथे अहमदाबाद मुंबई हायवे रोडवरील पेट्रोल पंपाजवळ चरस या अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता येणार असल्याची वालीव पोलीसांना खात्रीशीर बातमी मिळाली होती. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने व वरिष्ठांचे मार्गदर्शनाने मुंबई - अहमदाबाद रोडवरील चिंचोटी ब्रीजचे पुढे असलेल्या पेट्रोल पंपाजवळ पो.निरी. मिलींद साबळे, सपोनि एस. एन. सांगवीकर, पोउनि सी आर पाटील, पोउनि एल बी बोरा, पोहवा/१६८० सुशिल वाघ, पो.ना./१९२६ योगेश घुगे, पोना/९६२ महेश बोडके, पोना/८८७ शिवाजी पालवे, पोशि/८०१ महेश चौगुले अशा पथकाने सापळा रचला होता.

रात्री २३.४५ वाजताचे सुमारास गुजरात बाजुकडुन एक टोयाटो इन्होव्हा क्र. एम एच ०४ डीजे-४१५ ही गाडी येत असता गुप्त बातमीदाराने सदर गाडीतील इसमांकडे अंमली पदार्थ असल्याचा इशारा दिल्याने सदर गाडीस पोलीस पथकाने अडविले. सदर वाहनात ०३ इसम होते. त्यावेळी त्यांची झडती घेतली असता त्यांचेजवळ असलेल्या एका सुटकेस मध्ये एकुण ८ किलो ९७८ ग्रॅम वजनाचा एकुण २६,९३,४००/- रुपये किंमतीचा प्रतिबंधीत चरस हा अंमली पदार्थ मिळुन आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने वालीव पोलीस ठाणे गुरनं ९०८/२०२१ एन डी पी एस ॲक्ट ८ (क), २० (ब) प्रमाणे गुन्हा दिनांक २६.०८.२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात एकुण ०३ आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यांना मा. न्यायालयाने दिनांक ०२.०९.२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडी दिली असुन गुन्हयाचा अधिक तपास सपोनि एस एन सांगवीकर हे करीत आहेत.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री कैलास बर्वे, पोनि. मिलींद साबळे, सपोनि एस एन सांगवीकर, पोउनि सी आर पाटील, पोउनि एल बी बोरा, पोहवा/१६८० सुशिल वाघ पो.ना./१९२६ योगेश घुगे, पोना/९६२ महेश बोडके, पोना/८८७ शिवाजी पालवे, पोशि/८०१ महेश चौगुले यांनी केली आहे.

-----ooo-----